# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## गोदावरी संवर्धन कक्ष विभाग

मा.उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचिका क्र. **१७६/२०१२ चे अनुषंगाने नाशिक मनपा उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त**

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील जनहित याचिका क्र. १७६/२०१२ संदर्भात नाशिक महानगरपालिका स्तरावरील उपसमितीची बैठक मा.आयुक्त तथा प्रशासक सो. यांचे अध्यक्षतेखाली दि.११/१०/२०२३ रोजी स.११.०० वा. मा.आयुक्त कार्यालय येथील दालनात संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी यांनी प्रत्यक्ष व ऑनलाईन उपस्थिती नोंदविली.

१. डॉ.अशोक करंजकर,आयुक्त, मनपा नाशिक
२. प्रदिप चौधरी, अतिरिक्त आयुक्त (शहर), मनपा नाशिक
३. डॉ.नितिन गोयल, संचालक, निरी
४. अमर दुरगुळे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नाशिक
५. ज्ञा.ना.इगवे, विभागीय माहिती अधिकारी, नाशिक
६. डॉ.विजयकुमार मुंडे, उपआयुक्त (गोसंक), मनपा नाशिक
७. नितिन नेर, उपआयुक्त (अतिक्रमण), मनपा नाशिक
८. शिवकुमार वंजारी, शहर अभियंता, मनपा नाशिक
९. संजय अग्रवाल, कार्य.अभियंता, नगरनियोजन, मनपा नाशिक
१०. सुमंत मोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी, स्मार्ट सिटी
११. डॉ.आवेश पलोड, संचालक, घनकचरा व्यवस्थापन, मनपा नाशिक
१२. संजय अग्रवाल,अधिक्षक अभियंता (मलनि), मनपा नाशिक
१३. अविनाश धनाईत, अधिक्षक अभियंता (यांत्रिकी), मनपा नाशिक
१४. राजेश शिंदे, कार्यकारी अभियंता, पर्यावरण, मनपा नाशिक
१५. गणेश मैड, कार्यकारी अभियंता, (मलनि), मनपा नाशिक
१६. राजेश पंडित, अशासकिय सदस्य

सदर उपसमितीच्या बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थित केलेल्या मुद्यांवर चर्चा झाली.

| अ.क्र. | विभागाचे नांव | खुलासा |
|---|---|---|
| १ | मलनि:सारण विभाग | • नमामि गंगेच्या अनुषंगाने बेस मॅप तयार करण्याचे ८० टक्के काम झालेले आहे. साधारणपणे १ ते १.५ महिन्यात DPR तयार होणार आहे.<br>• STP अपग्रेडेशन संदर्भात NRCD ला सादर करण्यात आलेल्या प्रस्तावा संदर्भात IIT रुरकी चे प्राध्यापक श्री.अरुण कुमार यांनी तपोवन, आगरटाकळी, चेहेडि व पंचक या ४ STP ची पाहणी झाली असून त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्या संदर्भात complience ची कार्यवाही सुरु आहे.<br>• पावसाळी गटारीव्दारे सांडपाणी नदी नाल्यांमध्ये मिसळणाऱ्या एकुण ४३ ठिकाणांपैकी ३७ ठिकाणी आवश्यक कार्यवाही |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | करुन नदी नाल्यांमध्ये मिसळणारे सांडपाणी थांबविणेत आले आहे. उर्वरीत ठिकाणी पावसाळयाचे दिवस संपले असल्याने काम सुरु आहे.<br><br>मा.आयुक्त सो. यांनी सदरचे काम लवकर करणे संदर्भात आदेशीत केले. तसेच संबंधीतांची बिले लवकर अदा केली तर कामे लवकर होतील असे आदेशीत केले. |

| | | |
|---|---|---|
| २ | घनकचरा व्यवस्थापन विभाग | • दि.०१/०७/२०२३ ते दि.३०/०९/२०२३ पावेतो दंडात्मक कारवाई करुन र.रु.४३२६०/- दंड वसुल करण्यात आलेला आहे.<br>• तसेच प्लास्टिक वापरणाऱ्यांकडून माहे जानेवारी २०२३ ते सप्टेंबर २०२३ पावेतो र.रु.८८०००/- इतका दंड वसुल करण्यात आलेला आहे. संपुर्ण वर्षभरात सुमारे १०४८ कि.ग्रॅ. प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.<br>• C & D west घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत जमा करुन विल्हेवाट लावणेत येत असून दंडात्मक कारवाई देखिल करण्यात येत आहे.<br><br>मा.आयुक्त सो. यांनी सदरची मोहिम नियमित सुरु ठेवणे संदर्भात आदेशीत केले. |

| | | |
|---|---|---|
| ३ | नगर नियोजन विभाग | • रेन वॉटर हार्वेस्टींग बाबत नियमित कार्यवाही सुरु आहे. नाशिक मनपा क्षेत्रामध्ये नविन बांधकामास रेन वॉटर हार्वेस्टींग बंधनकारक करण्यात आलेले आहे. सदरची मोहिम नियमितपणे राबविण्यात येत आहे.<br>• रेड लाईन व ब्ल्यु लाईन बाबत मॅपिंगचे काम सुरु आहे. नदीपात्रातील अतिक्रमणा सदंर्भात प्राप्त तक्रारींबाबत माहिती घेऊन कार्यवाही करण्यात येईल.<br><br>मा.आयुक्त सो. यांनी सदरचे मॅपिंगचे कामकाज लवकर पुर्ण करुन पुढील कायदेशीर कार्यवाही करणे बाबत आदेशीत केले. |

| | | |
|---|---|---|
| ४ | सार्व.बांधकाम विभाग | • गोदावरी नदीच्या पुलांवर जाळया बसविणेबाबत निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु केलेली आहे.<br>• शहरातील सर्व नदयांच्या पुलांवर दर्शनी भागांवर नदीपात्रात प्रदुषण न करणे व दंडात्मक कारवाई असे फलक लावणेत आलेले आहेत. पुन्हा पाहणी करुन आवश्यक त्या ठिकाणी फलक लावणे बाबत कार्यवाही केली जाईल. तसेच फलकां संदर्भात प्राप्त अर्जांवर कार्यवाही करण्यात येईल.<br><br>मा.आयुक्त सो. यांनी नदी पुलांवर जाळया बसविण्याची निविदा प्रक्रिया जलद गतीने पुर्ण करणेबाबत आदेशीत केले. |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ५ | अतिक्रमण विभाग | • नदी किनारावरील अतिक्रमण होत असलेल्या ठिकाणांची यादी तयार करुन सदरचे अतिक्रमण काढणे बाबत सर्व विभागीय अधिकारी यांना अतिक्रमण बाबतचा गोषवारा तात्काळ तपासणी करुन सादर करावयास सांगण्यात आले.<br><br>मा.आयुक्त सो. यांनी गोदावरी नदीपात्रातील अनधिकृत अतिक्रमणांवर पुढील कायदेशीर कार्यवाही करणे बाबत आदेशीत केले. |

| | | |
|---|---|---|
| ६ | शिक्षण विभाग | • शिक्षण विभागाकडून मनपाच्या शाळेतील विद्यार्थ्यांव्दारे विविध उपक्रम राबवून जनजागृती करणेत येत आहे. पालापाचोळया पासून खत निर्मिती करणे, गणेशोत्सवात देखिल शाडू मातीपासून मुर्ती बनविण्याच्या कार्यशाळा मनपा शाळांमध्ये घेण्यात आल्या.<br><br>• वापरुन फेकून देण्यात आलेले प्लास्टिक बाटल्या तसेच प्लास्टिक रॅपर्स शालेय विद्यार्थ्यांकडून एकत्र गोळा करुन त्याची विल्हेवाट लावणेकामी घनकचरा विभागाकडे पाठविले जातात.<br><br>• तसेच विविध स्पर्धा, पथनाटय, कार्यशाळा इ. उपक्रम नियमित राबविण्यात येतात.<br><br>मा.आयुक्त सो. यांनी गोदावरी नदीपात्रातील प्रदुषण रोखणेकामी व प्लास्टिकचा वापर होऊ नये याकरीता जनजागृति करणेकामी मनपा शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांकडून विविध जनजागृतिपर उपक्रम नियमित राबविण्यात यावे असे आदेशीत केले. तसेच झालेल्या सर्व कार्यक्रमांची माहिती लगेच वेबसाईटवर प्रसिध्द करावी. |

| | | |
|---|---|---|
| ७ | स्मार्ट सिटी विभाग | • गोदाघाटावरील सुरु असलेली कामे लवकरात लवकर पुर्ण करणेत येतील.<br><br>• रामकुंड गोदाघाट येथे वाहनतळाचे नियोजन करण्यासाठी सार्व.बांधकाम विभागाकडे सुपुर्द करण्यात येतील.<br><br>मा.आयुक्त सो. यांनी स्मार्ट सिटी अंतर्गत गोदावरी नदी घाटावरील सुरु असलेली कामे त्वरीत पुर्ण करणे तसेच सार्व.बांधकाम विभागाने पुढील नियोजन करणे संदर्भात आदेशीत केले. |

| | | |
|---|---|---|
| ८ | विभागीय माहिती अधिकारी | • नाशिक महानगरपालिकेमार्फत गोदावरी नदी प्रदुषण कमीकरणेकामी केलेल्या कार्यवाही बाबतची माहिती जिल्हा माहिती अधिकारी यांचेकडेही प्रसिध्दी साठी देण्यात यावी.<br><br>नाशिक महानगरपालिकेमार्फत गोदावरी नदी प्रदुषणा संदर्भात केलेल्या कामकाजाची व विविध उपक्रमांची माहिती गोदावरी संबंधीत काम करणाऱ्या सर्व शासकिय, अशासकिय व जनसामान्यांपर्यंत पोहोचेल अशी व्यवस्था करावी असे मा.आयुक्त साहेब यांनी आदेशीत केले. |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ९ | निरी | • नाशिक मनपा STP तून प्रक्रिया करुन सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे निर्माण होणाऱ्या फोमिंगवर उपाययोजना सुचविणे बाबत कार्यवाही सुरु आहे.<br>• Deconcretization बाबत निरीचे सायंटिस्ट डॉ.पुजारी यांनी नाशिक येथे भेट देऊन प्रत्यक्षात पाहणी केलेली आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर तो सादर करण्यात येईल.<br>मा.आयुक्त सो. यांनी निरीने गोदावरी प्रदुषण नियंत्रण कामी उपाययोजना व त्यांची मते दयावीत याबाबत सुचना दिल्या. |

| | | |
|---|---|---|
| १० | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ | • गोदावरी नदीपात्रातील पाणी प्रदुषित करणाऱ्या कंपन्यांना कारणे दाखवा नोटीस बजावलेल्या आहेत. नाशिक मनपा मलनि:सारण विभाग व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडून एकत्रितपणे कामकाज करणेत येईल.<br>मा.आयुक्त सो. यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांना गोदावरी नदीपात्र प्रदुषित करणाऱ्या कंपन्यांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेशीत केले. |

| | | |
|---|---|---|
| ११ | श्री.राजेश पंडित | • सिवेजचे ऑडिट करणेची आवश्यकता असून सदरचे ऑडिट करण्यात यावे.<br>• बऱ्याच ठिकाणी सिवेज लाईनला पावसाळी गटारी जोडण्यात आलेल्या आहेत. तसेच पावसाळी गटारींच्या लाईनला सिवेज लाईन जोडण्यात आलेली आहे. त्याचे ऑडिट करणे गरजेचे आहे.<br>• तसेच रेन वॉटर हार्वेस्टींग करणाऱ्या नागरिकांना प्रोत्साहन करण्यात यावे.<br>मा.आयुक्त सो. यांनी संबंधीत विभागांना पुढील कायदेशीर कार्यवाही करणेबाबत आदेशीत केले. |

येणेप्रमाणे चर्चा होऊन बैठकीच्या शेवटी उपआयुक्त , गोदावरी संवर्धन कक्ष यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

(डॉ. अशोक करंजकर, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
नाशिक महानगरपालिका, नाशिक

स्थळ : नाशिक महानगरपालिका, नाशिक
दिनांक :१८/१०/२०२३
जा.क्र.गो.सं.क./वशि/१८९/२०२३



Scanned by CamScanner